MHPU180017632022

नि. दिवाणी दावा क्र.२९३/२०२२
शंकर व इतर
विरुध्द
संजय व इतर

निशाणी क्रमांक २७ वरील आदेश
(पारीत दिनांक २०/१२/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी अबेटमेंट सेट असाईड करुन मिळणे बाबत पुढील प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई करीता दाखल केला असून दरम्यानच्या काळात दावा चालु असताना प्रतिवादी क्र. १ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे हे दिनांक २५/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी उशिर झाला असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांच्या करीता दावा अबेट झालेला असून प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याकारणाने वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. सदरचा विलंब हा ग्रामपंचायत यांच्याकडून मृत्यूचा दाखला वेळेवर प्राप्त न झाल्याने झालेला आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अबेटमेंट सेट असाईड होण्याकरीता दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. २ यांच्या मार्फत प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेतलेले नसल्याने दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती त्यांनी केली.

४. वादी यांच्या अर्जातील तसेच प्रतिवादी यांच्या दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. वादी यांनी त्यांच्या अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ संजय चंदर उर्फ चंद्रकांत जावळे मयत झाल्याबाबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी ३० वरील यादीनुसार दाखल केलेले आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकती बाबतचा असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ हे दिनांक २५/०१/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज हा दि.१०/११/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा

विचार करता वादी यांना संधी देऊन अबेटमेंट सेट असाईड करणे गरजेचे वाटते. परंतु, त्यासोबतच वादी यांच्यामुळे झालेला विलंबदेखील दुर्लक्षीत करता येणार नाही. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्यावर खर्च लादून मंजूर करणे योग्य हाईल. करीता मी, पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

०१ सदरचा अर्ज खर्च रक्कम रु.१०००/- (रुपये एक हजार फक्त) सह मंजूर करण्यात येतो.

०२ वादी यांनी खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. २ यांना द्यावी.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2024.12.21 16:45:24 +0530

दिनांक- २०/१२/२०२४.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 20/12/2024. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 20/12/2024. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 21/12/2024. |